क्र.साप्रवि/रवका/न.क्र.३४८/ No 23434

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

दिनांक : 26 JUL 2010

# परिपत्रक

विषय : महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाकडे पाठविल्या जाणाऱ्या पत्रावर पुर्वीचा संदर्भ तारीख नमूद करण्याबाबत.

संदर्भ : कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.एचडीओ-२०१०/सीआर ६०/आस्था-३ दि.३० जून २०१०.

.....

कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.एचडीओ-२०१०/सी.आर.६०/आस्था-३ दि.३० जून २०१० अन्वये असे नमूद केले आहे की, शासनाकडे गृह विभागाच्या अधिपत्याखालील विविध कार्यालयाकडून पत्रव्यवहार प्राप्त होत असतो. सदर पत्रव्यवहार करताना त्या पत्रावर यापुर्वी केलेल्या संबंधीत पत्रव्यवहाराचा संदर्भ क्रमांक, दिनांक नमूद केलेला नसतो. त्यामुळे संबंधीत कार्यासनास चिन्हांकीत न होता विविध कार्यासनांकडे ती पत्रे पाठविली जातात.

२. वरील कारणास्तव सदर पत्रे नेमक्या कार्यासनास चिन्हांकीत न झाल्यामुळे अशी पत्रे प्रलंबित राहतात व त्यामुळे प्रस्तावावर कार्यवाही होण्यास विलंब होतो, हा विलंब टाळण्यासाठी त्यांनी यावर उपाययोजना म्हणून खालील सूचना केल्या आहेत.

अ) शासनाकडे पत्रव्यवहार करताना यापुर्वी केलेल्या संबंधीत पत्रव्यवहाराचा संदर्भ, क्रमांक व दिनांक यांची नोंद करण्यात यावी.

ब) न्यायालयीन प्रकरण इ.च्या प्रती शासनास अग्रेषित करताना संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचा हुद्दा क्रमांक, कार्यालयाचे नाव नमूद करण्यात यावे.

३. तरी मुख्य कार्यालयातील सर्व विभाग प्रमुखांना विनंती करण्यात येते की, शासनासोबत पत्रव्यवहार करताना वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

४. सदर परिपत्रक म.रा.वि.वितरण कं. मर्यादितच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

***( सु. य. पाटील )***
***मुख्य महाव्यवस्थापक (क)***

प्रत :
महावितरण कंपनीच्या मुख्य कार्यालयातील विभागीय प्रमुख स्तरापर्यंत.

*D:\O&M\Circular F.N.348-Date & Ref*
*23/7/10*